संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com
दैनिक माणदेशी बुलंद आवाज..
# माणदेश एक्सप्रेस
संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे
मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६
www.mandeshexpress.com




• वर्ष : ७ वे • • अंक : ६७ वा • • गुरुवार दि. ५ ऑक्टोबर २०२३ • • किंमत २ रु • पाने : ४ • RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025

## बारा जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची नियुक्ती

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** राज्यातील १२ जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची सुधारित यादी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केली. या सुधारित यादीनुसार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पुणे जिल्ह्याचे पालकमंत्रीपद देण्यात आले आहे. तर हसन मुश्रीफ यांची कोल्हापूरच्या पालकमंत्रीपदी नियुक्ती केली आहे. राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे अकोल्याची जबाबदारी दिली आहे. दिलीप वळसे-पाटील बुलढाण्याचे पालकमंत्री बनले आहेत. धनंजय मुंडे यांची त्यांच्या बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री नियुक्ती करण्यात आली आहे.



अजित पवार गणेशोत्सवादरम्यान वर्षा बंगल्यावर गणरायाच्या दर्शनासाठी गेले नव्हते. त्यामुळे ते नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. दरम्यान, काल झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीला अजित पवार उपस्थित राहिले नव्हते. यामुळे ते नाराज असल्याच्या चर्चेला अधिक जोर मिळाला होता. याच दरम्यान, आज १२ जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची यादी जाहीर झाली. त्यात अजित पवार गटातील आमदारांना झुकते माप देण्यात आल्याचे दिसते.

**हे असणार पालकमंत्री**
- पुणे - अजित पवार
- अकोला - राधाकृष्ण विखे- पाटील
- सोलापूर - चंद्रकांत दादा पाटील
- अमरावती - चंद्रकांत दादा पाटील
- वर्धा - सुधीर मुनगंटीवार
- भंडारा - विजयकुमार गावित
- बुलढाणा - दिलीप वळसे-पाटील
- कोल्हापूर - हसन मुश्रीफ
- गोंदिया - धर्मरावबाबा आत्राम
- बीड - धनंजय मुंडे
- परभणी - संजय बनसोडे
- नंदूरबार - अनिल पाटील

## विजेचा करंट देऊन कुटुंबाला संपविण्याचा प्रयत्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कडेगाव :** वांगी (ता.कडेगाव) येथील अशोक निकम यांच्या घरासमोर व मागील बाजूस दरवाजाला विजेच्या विद्युतवाहक तारेद्वारा ११ केव्हीचा करंट देऊन संपूर्ण कुटुंब संपवण्याचा धक्कादायक प्रयत्न अज्ञाताकडून झाला. मात्र, यातून हे कुटुंब सुखरूप बचावले आहे. परंतु या घटनेमुळे मात्र परिसरात खळबळ माजली आहे. याबाबत घटनास्थळावरून मिळालेली अधिक माहिती अशी की, अशोक निकम हे वांगी गावाच्या उत्तरेस बिरोबाचीवाडी रोड लगत असलेल्या घरात कुटुंबासह राहतात. मंगळवारी (दि.३) अशोक निकम आपली पत्नी व दोन मुलांसह जेवण करून झोपले. दरम्यान, रात्री १ वाजता अचानक घरासमोर विजेचा मोठा जाळ झाला व घरातील लाईट गेली. मात्र, घराजवळ ट्रांसफार्मर असल्यामुळे त्यांनी ट्रांसफार्मरमध्ये जाळ झाला असेल, असे समजून दुर्लक्ष केले. मात्र, दुसऱ्यांदा वीज आल्यानंतर घरालगत जाळ झाल्यामुळे त्यांनी घरातील सर्वांना जागे केले. व बॅटरीच्या सहायाने बाहेर पाहिल्यास त्यांना विजेच्या विद्युत वाहक तारा घराच्या दरवाजाजवळ अडकवलेली दिसून आल्याचे पाहताच ते घाबरले.

त्यानंतर त्यांनी बाहेर येऊन पाहिले असता घरासमोर असलेल्या ट्रांसफार्मरवरील ११ केव्ही तारेतून घराच्या पुढील व मागील दरवाजास विद्युत वाहक तारेने करंट दिल्याचे दिसून आले. तर करंट दिलेली तार काढून घेऊन जाण्यासाठी त्या तारेला एक हजार फूट लांब दोरी बांधून ती बाजूला असलेल्या उसातून जोडून ठेवली असल्याचे दिसून आले. घरातील लोक बाहेर आल्यावर अज्ञात काही जण ती दोरी ओढण्याचा प्रयत्न करत होते. मात्र, त्यांना त्यामध्ये अपयश आले. त्यानंतर त्यांनी घटनास्थळापासून पलायन केले. या घटनेबाबत अशोक निकम यांनी पोलिसात तक्रार दिली आहे.

## बांबवडे येथे स्वाभिमानीने 'अथणी' ची साखर, वाहतूक रोखली

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**शाहुवाडी :** सोनवडे-बांबवडे (ता. शाहूवाडी) येथील अथणी शुगर प्रायव्हेट लि. (युनिट २) कारखान्याकडे साखरेची वाहतूक करण्यासाठी कर्नाटकातून आलेले काही ट्रक स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी रोखली. त्यानंतर संबंधित वाहतूकदारांना शेतकऱ्यांच्या आंदोलनाची भूमिका समजावून माघारी पाठविले.



**कोल्हापूर : स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी 'अथणी' ची साखर व स्पिरीट वाहतूक रोखली**

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने गेल्या गळीत हंगामातील तुटलेल्या उसाचा दुसरा हप्ता प्रतिटन ४०० रुपये ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर बुधवारी (दि.४) दुपारी संघटनेचे शाहूवाडी तालुका अध्यक्ष सुरेश म्हाऊटकर, जयसिंग पाटील, भैय्या थोरात यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी कारखाना साईटवरील रस्त्यावर सदरची वाहतूक रोखण्यात आली.

दरम्यान, अथणी शुगर प्रशासनाने स्वाभिमानीचे माजी खा.राजू शेट्टी यांना एक पत्र लिहून त्यामध्ये गत गळीत हंगामातील ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना कारखान्यामार्फत दरवर्षी प्रमाणे सवलतीच्या दरातील टनेज वरील सुमारे ३ हजार ७९६ क्विंटल साखरेचे वितरण करण्यात येणार आहे.यामध्ये संघटनेच्या माध्यमातून सुरू असलेल्या आंदोलनाचा अडथळा होऊ नये.तसेच शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्याची विनंती केली आहे.

मात्र, संघटनेच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी कारखाना प्रशासनाची विनंती धुडकावून लावत साखर, स्पिरिट यासह अन्य उपपदार्थ वाहतुकीची वाहने कोणत्याही परिस्थितीत कारखान्यातून बाहेर पडू दिली जाणार नसल्याचे ठणकावले. यावेळी शाहूवाडी पोलिसांच्या संरक्षणामध्ये सदरची साखर वाहतूक करण्याच्या अथणी प्रशासनाच्या हालचाली दिसताच तालुक्यातील स्वाभिमानी संघटनेचे कार्यकर्ते बांबवडे येथे एकत्र जमा झाले होते.यामुळे काही स्थानिक साखर खरेदीदार तसेच परप्रांतीय वाहतुकदारांची वाहने खोळंबून राहिल्याचे दिसून आले.

## जात प्रमाणपत्र त्रुटी पुर्तता शिबीर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** ग्रामपंचायत निवडणूक २०२२-२३ मध्ये राखीव प्रवर्गावर निवडून आलेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांनी समिती कार्यालयाकडे जात प्रमाणपत्र पडताळणीचा अर्ज सादर केला आहे, परंतु समिती कार्यालयाने कळविलेल्या त्रुटींची अद्याप पुर्तता केली नाही अथवा समिती कार्यालयाशी संपर्क केला नाही, अशा उमेदवारांकरीता ९ ते २० ऑक्टोबर २०२३ पर्यंत तालुकानिहाय विशेष मोहीम आयोजित करण्यात आली आहे. संबंधित तालुक्यातील उमेदवारांनी शिबीराच्या दिवशी मुळ कागदपत्रांसह जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती सांगली येथे उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव संभाजी पोवार यांनी केले आहे.

जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती सांगली येथे आयोजित तालुकानिहाय शिबीराचा दिनांक पुढीलप्रमाणे. वाळवा-इस्लामपूर ९ ऑक्टोबर, शिराळा १० ऑक्टोबर, तासगाव ११ ऑक्टोबर, कवठेमहांकाळ १२ ऑक्टोबर, कडेगाव १३ ऑक्टोबर, पलूस १६ ऑक्टोबर, आटपाडी १७ ऑक्टोबर, मिरज १८ ऑक्टोबर, खानापूर-विटा १९ ऑक्टोबर व जत २० ऑक्टोबर २०२३.

## सांगली महापालिकेच्यावतीने ई बससेवा सुरु करणार : आयुक्त पवार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** महापालिकेच्यावतीने परिवहन बससेवा सुरू करण्यात येणार असून यासाठी केंद्र शासनाच्या योजनेतून ५० विद्युत बस मिळणार असल्याची माहिती महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त सुनील पवार यांनी बुधवारी पत्रकार बैठकीत दिली. पीएम ई बस सेवा सुरू करण्याबाबत तज्ञांच्या व नागरिकांच्या सूचना विचारात घेण्यासाठी महापालिका सभागृहात शनिवार दि. ७ ऑक्टोंबर रोजी चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे.



महापालिकेसाठी सांगली महापालिकेसाठी केंद्र व राज्य शासनाच्या योजनेतून १०० ईबस उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तथापि, शहराची गरज लक्षात घेउन ५० बस घेण्याचा निर्णय महापालिकेने घेतला असून या सर्व बस वीजेवर चालणार्या असल्याने पर्यावरणाचाही प्रामुख्याने विचार करण्यात आला आहे.सांगलीसाठी मोठ्या व मिनी बस मागविण्यात येणार असून यासाठी शासनाकडून प्रतिकिलो मीटरसाठी २४ ते २० रूपये अनुदान मिळणार आहे.

या बससाठी वखारभागातील एक एकर जागेवर वीजभार जोडणी केंद्र सुरू करण्यात येणार असून बस आगारासाठी या ठिकाणी महापालिकेची सुमारे एक एकर जागाही निश्चित करण्यात आली आहे. सांगली, मिरज व कुपवाड शहरापासून आजूबाजूच्या ग्रामीण भागामध्येही प्रवासी वाहतूक करण्यासाठी मार्ग निश्चित करण्यात आले असून सद्यस्थितीला औदुंबर, नृसिंहवाडीसह ३९ मार्ग निश्चित करण्यात आले असून दैनंदिन वाहतूक १५ हजार ५०० किलोमीटर होणार आहे.

या परिवहन सेवेबाबत नागरिकांच्या अपेक्षा, तज्ञांच्या सूचना यांचा विचार करण्यासाठी शनिवारी महापालिका सभागृहात चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. येत्या चार महिन्यात ही बससेवा सुरू करण्याचा विचार असल्याचे आयुक्त पवार यांनी सांगितले. यावेळी उपायुक्त राहूल रोकडे, वैभव साबळे हे उपस्थित होते.

## निंबवडेचा हिंदकेसरी सर्जा हरपला!

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/ रेश्मा राजगे :** आटपाडी तालुक्यातील निंबवडे या गावातील सचिन विठ्ठल पाटील यांच्या सर्जा नावाच्या बैलाचा दि. २ ऑक्टोबर रोजी मृत्यू झाला. हिंदकेसरी सर्जा हा शर्यतीमध्ये नावाजलेला होता. बैलगाडी शर्यतीमध्ये तो नेहमीच प्रथम क्रमांकाने विजय मिळवायचा.



हिंदकेसरी सर्जाला चांगल्या प्रमाणात मागणी देखील होती. सर्जाची विक्री किंमत साडे तीन लाख रुपये एवढी होती. सर्जाने नेहमीच प्रत्येक शर्यती जिंकून लाखो रुपयांचे बक्षीस देखील मिळवून दिले होते. त्यामुळे सर्जावर नेहमीच कौतुक होत असायचे. म्हणूनच त्याच्या मालकाने त्याला हिंदकेसरी सर्जा असे नाव देखील दिले.

परंतु, मागील काही दिवसात लम्पी स्कीन या त्वचा आजाराच्या प्रादुर्भावामुळे जिल्ह्यात पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने ही बाब गांभीर्याने घेत विशेष खबरदारी घेतली होती. मात्र जनजागृती, वेळोवेळी लसीकरण, जनावरांचे बाजार बंद केल्यानंतर हे संकट कमी झाले होते.

परंतु मागच्या आठ दिवसापासून हिंदकेसरी सर्जाला लम्पी आजाराने घेरले. त्याच्यावर शासकीय रुग्णालयातील डॉ. चव्हाण यांच्याकडून उपचार सुरु होते. परंतु उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाल्याने सर्व बैलगाडा शर्यतप्रेमी मध्ये शोकांतिका पसरली आहे.

## क्रीडा स्पर्धा आयोजनासाठी पदाधिकाऱ्यांची बैठक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** शासनाने सन २०२३-२४ च्या शैक्षणिक वर्षातील शालेय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी एकूण ९० खेळाच्या (अनुदानित व विनाअनुदानित) तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धेस मान्यता प्रदान केली आहे.

विनाअनुदानित खेळाच्या शालेय क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संबंधित खेळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक शुक्रवार, ६ ऑक्टोबर २०२३ रोजी दुपारी ३ वाजता सांगली हायस्कूल आमराई जवळ सांगली या ठिकाणी आयोजित केली आहे. या बैठकीस संबंधित खेळाच्या पदाधिकाऱ्यांनी स्वत: वेळेत उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी किरण बोरवडेकर यांनी केले आहे.

जिल्हा संघटनेने पुढील विनाअनुदानित खेळांच्या स्पर्धेचे तांत्रीकदृष्ट्या यशस्वी आयोजन करावयाचे आहे. आष्टे-डू-आखाडा, युनिफाईट, कुडो, स्पीडबॉल, टेग-सु-डो, फिल्ड आर्चरी, मॉटेक्सबॉल क्रिकेट, मिनीगोल्फ, सुपर सेवन क्रिकेट, बेल्ट रेसलिंग, फ्लोअरबॉल, थायबॉक्सींग, हाफकिडो बॉक्सींग, रोप स्किपींग, सिलंबम, वूडबॉल, टेनिस व्हॉलीबॉल, थांग ता मार्शल आर्ट, कुराश, लगोरी, रस्सीखेच, पॉवरलिफ्टींग, बीच व्हॉलीबॉल, टार्गेटबॉल, टेनिस क्रिकेट, जित कुने दो, फुटसाल, कॉर्फबॉल, टेबल सॉकर, हुप क्वॉन दो, युग मुन दो, वोवीनाम, ड्रॉप रो बॉल, ग्रॅपलिंग, पेंन्टाक्यू, लंगडी, जंपरोप, स्पोर्ट डान्स, चॉकबॉल, चॉयक्कांदो, फुटबॉल टेनिस, बुडो, म्युजिकल चेअर, टेनिसबॉल क्रिकेट.अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी (दूरध्वनी क्रमांक ०२३३-२९९०६१६) संपर्क साधावा.







## उमदीत जुगार अड्ड्यांवर छापेमारी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**जत :** उमदी येथे जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धाड टाकली आहे. या छाप्यात तीन जुगार अड्ड्यावर कारवाई करत ९ हजार ९१५ रुपयेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तीन ठिकाणी वेगवेगळ्या केलेल्या कारवाईत उमेश गिरमला हुन्नूर , गुंडाप्पा भीमाना कोळी , अमन आप्पासाहेब नदाफ या तिघा संशयितावर मुंबई जुगार कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. याबाबतची फिर्याद पोलिस नाईक सुनील व्हनखंडे यांनी उमदी पोलिसात दिली आहे. ही कारवाई पोलीस उपविभागीय अधिकारी सुनील साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस नाईक सुनील व्हनखंडे यांच्या पथकाने कारवाई केली आहे.या घटनेचा अधिक तपास पोलीस कॉस्टेबल कपिल काळेल करत आहेत.

पोलिसांनी दिलेली माहिती अशी ,उमदी येथे तीन ते चार जुगार अड्डे सुरू आहेत. याबाबतची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील साळुंखे यांना मिळाली होती .यानुसार त्यांनी सायंकाळी उमदी बाजार कट्ट्यावरील तीन ठिकाणी जुगार अड्ड्यावर छापा टाकण्यात आला. पेन व जुगाराचे साहित्य व रोख रक्कम ९ हजार ९१५ रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे व या ठिकाणी हून तिघांना ताब्यात घेतले आहे.तसेच सदरचे मटके अड्डा बिगर परवाना मालक राजू शिंदे यांच्याकरिता सुरू केल्याचे स्पष्ट केले आहे. ही कारवाई पोलीस नाईक सुनील व्हनखंडे ,विजय आकुल, संतोष चव्हान, अजित मदने यांनी केली आहे.



# संपादकिय

## अविनाश साबळेचे यश !

चीनमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत विक्रमी वेळ नोंदवताना अविनाशने भारतासाठी ३००० मीटर स्टीपलचेस प्रकारात ऐतिहासिक सुवर्णपदक मिळवले. अविनाशने आशियाई क्रीडा स्पर्धेतील ३००० मीटर स्टीपलचेसमध्ये सुवर्णपदकाची कमाई केली. ही कामगिरी करणारा तो पहिला पुरुष भारतीय धावपटू ठरला. बीड जिल्ह्यातील मांडवा गावात एका शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या अविनाशला शाळेत जाण्यासाठी रोजचा ६ किमी प्रवास करायला लागायचा. अशाच परिस्थितीत इयत्ता चौथीत असताना क्रीडाशिक्षक बाबासाहेब तावरे यांनी अविनाशला १ किमी शर्यतीत सहभागी होण्यास सांगितले. अविनाशने ही शर्यत जिंकली. इथून त्याने धावण्याचे धडे घ्यायला सुरुवात केली. औरंगाबादमध्ये क्रीडा प्रबोधिनीत त्याने स्वतःला घडवले. तीन वर्षांनी पुन्हा बीडला आल्यावर तो लष्करात ५ महार रेजिमेंटमध्ये दाखल झाला आणि आंतर सर्व्हिस क्रॉसकंट्री शर्यतीत २०१५ मध्ये त्याने सहभाग घेतला. त्याची कारकीर्द इथूनच सुरू झाली. लष्करी सेवेत असताना माजी आंतरराष्ट्रीय खेळाडू अमरीश कुमार यांनी अविनाशमधील गुण हरले. त्याच्याकडून कठोर मेहनत करून घेतली. अमरीश यांच्या मार्गदर्शनाखाली दीड वर्षात अविनाशने इतकी प्रगती केली की चेन्नई राष्ट्रीय स्पर्धेत स्टीपलचेस शर्यतीत पहिले विजेतेपद मिळवले. वेग आणि ताकद यात अमरीश यांनी अविनाशला तयार केले. मानसिकदृष्ट्या अविनाशला कणखर बनवत आपण कोणत्याही परिस्थितीत जिंकू शकतो याचा आत्मविश्वास दिला.

प्रशिक्षक अमरीश यांनी अविनाशला घडवले यात शंकाच नाही, पण त्याची जिद्द आणि कठोर मेहनत घेण्याची त्याची सवय तितकीच महत्त्वाची होती. सीमेचे रक्षण करताना कधी सियाचिनच्या थंडीत, तर कधी राजस्थानच्या कमालीच्या उष्णतेत त्याने आपली कर्तव्यनिष्ठा दाखवून दिली. त्यामुळेच कठोर मेहनतीचे मूर्तिमंत उदाहरण म्हणून अविनाशकडे बघितले जाते. अविनाशचे लष्करातील प्रशिक्षक अमरीश कुमार, पहिले परदेशी प्रशिक्षक निकोलाय आणि सध्याचे स्कॉट सिमन्स या प्रत्येकाने अविनाशच्या कठोर मेहनतीचे कौतुक केले आहे.

एकामागोमाग एक असा नऊ वेळा अविनाशने आपलाच राष्ट्रीय विक्रम मोडला. स्टीपलचेस प्रकारातील राष्ट्रीय पातळीवर त्याची मक्तेदारी निर्माण झाली. परंतु आंतरराष्ट्रीय स्तरावर अजून तो झळकत नव्हता. गेल्या वर्षी मात्र राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत अविनाशने रौप्यपदक जिंकले. या एकाच क्षणाने आंतरराष्ट्रीय स्तरावर अविनाशचा बोलबोला झाला. याचे मुख्य कारण म्हणजे १९९० पासून या स्पर्धा प्रकारात असलेली केनियन धावपटूंची मक्तेदारी अविनाशने मोडून काढली. शारीरिक क्षमता पणाला लागणाऱ्या या शर्यतीत आफ्रिकेचे धावपटू आघाडीवर असतात. आफ्रिकन धावपटूंना आपणही हरवू शकतो हे अविनाशने दाखवून दिले.

# खासदार मोहम्मद फैजल यांचे लोकसभेतून निलंबन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** लक्षद्वीपचे राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार मोहम्मद फैजल यांचे लोकसभेतून निलंबन करण्यात आले आहे. एकाच वर्षात दोनदा खासदारी रद्द झाल्यामुळे मोहम्मद फैजल यांना मोठा धक्का बसला आहे. फैजल हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे लक्षद्वीपचे खासदार आहेत.



मोहम्मद फैजल

खुनाचा प्रयत्न केल्याच्या प्रकरणात केरळ उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेल्या शिक्षेच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने केरळ उच्च न्यायालयाला सहा आठवड्यांत पुनर्विचार करण्याचे निर्देश दिले होते. तसेच जोपर्यंत उच्च न्यायालय निर्णय घेत नाही, तोपर्यंत त्यांची शिक्षा स्थगित राहील, असेही स्पष्ट केले होते.

आता केरळ उच्च न्यायालयाने खासदार मोहम्मद फैजल यांच्या शिक्षेला स्थगिती देण्यास नकार देत याचिका फेटाळून लावली आहे. त्यामुळे फैजल यांना मोठा धक्का बसला आहे. यानंतर आता मोहम्मद फैजल यांचे लोकसभेतून निलंबन करण्यात आले आहे. खासदार मोहम्मद फैजल यांना २००९ मधील एका राजकीय खुनाच्या प्रकरणात दहा वर्षांची शिक्षा झाली होती. ही शिक्षा आधी सत्र न्यायालयाने ठोठावली होती. त्यावर केरळ उच्च न्यायालयाने तात्पुरती स्थगिती दिली होती. मात्र, नंतर या प्रकरणातील पीडितांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. यानंतर पुन्हा सर्वोच्च न्यायालयाने केरळ उच्च न्यायालयाला पुनर्विचार करण्याचे निर्देश दिले होते.




# लंडनहून वाघनखं भारतात आणण्याच्या करारावर स्वाक्षरी



**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेत महत्त्वाची भूमिका असलेल्या गनिमी काव्याचं उत्तम उदाहरण असलेली वाघनखं ब्रिटनमधून भारतात आणण्यासंबंधीचा सामंजस्य करार आज लंडन येथे करण्यात आला. शिवछत्रपतींची ही वाघनखं आता केवळ महाराष्ट्रच नव्हे तर भारतातील तमाम शिवप्रेमींसाठी एक प्रकारे शिवदर्शन ठरणार आहे, असे प्रतिपादन यावेळी दूरदृश्यसंवाद प्रणालीद्वारे मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी केले. व्हिक्टोरिया अँड अलबर्ट म्युझियमचे संचालक ट्रायस्टम हंट यांच्यासोबत वाघनखं भारतात आणण्याच्या करारावर यावेळी स्वाक्षरी करण्यात आली. सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, उद्योग मंत्री उदय सामंत, मुख्यमंत्र्यांचे तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, संचालक, पुरातत्व आणि संग्रहालय तेजस गर्गे हे यावेळी उपस्थित होते.

ही वाघनखं नोव्हेंबर २०२३ ते नोव्हेंबर २०२६ या तीन वर्षांच्या कालावधीकरिता भारतात राहतील. ही वाघनखं महाराष्ट्रातील विविध संग्रहालयात शिवप्रेमी, इतिहासप्रेमी नागरिकांना पाहण्यासाठी ठेवण्यात येतील. यात सातारा, नागपूर, कोल्हापूर येथील राज्य पुरातत्व विभागाच्या संग्रहालयांसह मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाचा समावेश राहणार आहे.

यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, सर्व शिवप्रेमींसाठी, अवघ्या महाराष्ट्रासाठी आणि देशासाठी सुद्धा आजचा हा क्षण ऐतिहासिक आहे. शिवछत्रपतींच्या राज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्धापनदिनाचा सोहळा राज्यात मोठ्या उत्साहात साजरा केला. याच वर्षात आपण शिवछत्रपतींच्या पराक्रमाचे प्रतीक असणारी ही वाघनखं शिवभूमीत आणत आहोत, हा दुग्धशर्करा योग आहे. शिवकालीन हत्यारांमध्ये वाघनखांना मोठं महत्त्व होतं, असे त्यांनी सांगितले.

शिवस्पर्श झालेली ही वाघनखं आपल्यासाठी अनमोल आहेत. शिवराज्याभिषेकाच्या निमित्तानं सांस्कृतिक कार्य विभागानं हा आगळा संकल्प केला आणि तो पूर्णत्वासही नेला, त्याबद्दल या विभागाचे मंत्री सुधीर मुनगंटीवार आणि सांस्कृतिक विभागातील त्यांचे सहकारी कौतुकास पात्र आहेत, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी काढले. या करारासाठी राज्याचा सांस्कृतिक कार्य विभाग, केंद्र सरकार आणि ब्रिटीश सरकार यांचे अभिनंदन, अशा शब्दात त्यांनी भावना व्यक्त केल्या. करतो ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांसारखी दूरदृष्टी असलेला राजा भारतात दुसरा झाला नाही.

शिवछत्रपतींची ही वाघनखं आता केवळ महाराष्ट्रच नव्हे तर भारतातील तमाम शिवप्रेमींसाठी एक प्रकारे शिवदर्शन ठरणार आहे. शिवप्रतापाचं स्मरण करून देणारं ते निमित्त ठरेल. या शिवप्रतापाची प्रेरणा घेऊनच आपली पुढची पिढी महाराजांनी घालून दिलेल्या आदर्शावर वाटचाल करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

लंडन येथे आज ढोल आणि ताशांच्या निनादात आणि 'छत्रपती शिवाजी महाराज की जय ' या जयघोषात अतिशय स्फूर्तिदायक वातावरणात आज या करारावर स्वाक्षरी करण्यात आली. यावेळी या संग्रहालयातील ऐतिहासिक ठेवा मंत्री श्री. मुनगंटीवार, मंत्री श्री. सामंत आणि उपस्थितांनी पाहिला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाचे ३५० वे वर्ष प्रारंभ होताच ही वाघनखे भारतात परत आणण्याचा संकल्प मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी केला होता. यासाठी केंद्र शासन तसेच आंतराष्ट्रीय पातळीवर राज्य शासनाच्या वतीने त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. दिनांक १५ एप्रिल २०२३ रोजी मुंबई येथे ब्रिटेनचे पश्चिम भारत उप उच्चायुक्त अँलेन गँमेल यांच्यासह ब्रिटनच्या राजकीय व द्विपक्षीय संबंध उपप्रमुख श्रीमती इमोगेन स्टोन यांच्यासोबत बैठक घेवून महाराष्ट्र शासनाने व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट संग्रहालयाशी पत्रव्यवहार सुरू केला होता. त्यास खऱ्या अर्थाने आज यश आले.

# मातंग समाजाच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक – मंत्री शंभूराज देसाई

**मुंबई :** मातंग समाजापर्यंत विविध योजना पोहोचविण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम तयार करण्यात आला आहे. मातंग समाजाच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक असल्याचे, राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले. मातंग समाजाच्या विविध मागण्यांबाबत मंत्री श्री. देसाई यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात बैठक झाली. मंत्री श्री. देसाई म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार ही बैठक घेण्यात आली आहे. मुख्यमंत्री श्री. शिंदे मातंग समाजाच्या मागण्यांबाबत सकारात्मक आहेत. मुंबईत आझाद मैदान येथे मातंग समाजाच्या वतीने विविध मागण्यांसंदर्भात मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. मुख्यमंत्र्यांच्यावतीने यावेळी मी उपस्थित राहून सकारात्मक चर्चा केली होती. याबाबत दोन बैठका घेतल्या आहेत, असे मंत्री श्री. देसाई यांनी यावेळी सांगितले.

या बैठकीला सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे,समाज कल्याण आयुक्त ओमप्रकाश बकोरिया, 'बार्टी'चे महासंचालक सुनील वारे, तसेच मातंग समाजाच्या विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मातंग समाजाच्या प्रश्नांबाबत घेण्यात आलेल्या बैठकीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. मंत्री श्री. देसाई म्हणाले की, कर्नाटक व पंजाब राज्याने त्यांच्या राज्याकरिता अनुसूचित जातीचे जातीनिहाय उपवर्गीकरण केले आहे. त्या संदर्भात अवलंबिलेल्या कायदेशीर बाबींचा अभ्यास करण्यासाठी पंजाब व कर्नाटक या राज्यांना भेट देण्यासाठी पाठविण्यात येणाऱ्या शिष्टमंडळात मातंग समाजाच्या प्रतिनिधींचाही समावेश करण्यात येईल. लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाच्या शिफारशीनुसार संबंधित विभागाकडून अनुपालन अहवाल मागविण्यात येईल. या आयोगाच्या ८२ शिफारशी पैकी ६८ शिफारशी तत्त्वतः मान्य केल्या आहेत. मातंग समाज योजनांच्या लाभापासून वंचित राहू नये यासाठी जिल्ह्यांमध्ये जनजागृती शिबिरे आयोजित करावीत असे निर्देश संबंधितांना यावेळी मंत्री श्री. देसाई यांनी दिले.

साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (आर्टी) स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव तयार करावा, अशा सूचना यावेळी मंत्री श्री. देसाई यांनी दिल्या. तसेच साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांचे चिरागनगर येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याकरता विविध विभागांचे अभिप्राय मागविण्यात यावेत, असेही मंत्री श्री. देसाई यांनी सांगितले.

माणदेश एक्सप्रेस
व्यवसायिक जाहिरात योजना
आपल्या व्यवसायाचा प्रचार, प्रसार करण्यासाठी दैनिक 'माणदेश एक्सप्रेस' ने आणली आहे अल्प दरात जाहिरात योजना आहे.
आटपाडी तालुक्यासह सांगली तसेच माणदेशातील अग्रगण्य दैनिक माणदेश एक्सप्रेस च्या माध्यमातुन आपली जाहिरात ५० हजार लोकपर्यंत पोहचवा.
10 X 5 cm १०००/- रुपयात महिनाभर
10 X 10 cm २०००/- रुपयात महिनाभर
20 X 7 cm ३०००/- रुपयात महिनाभर
20 X 13 cm ४०००/- रुपयात महिनाभर
टीप : आतील पानासाठी हे दर १० टक्के कमी आहेत
याशिवाय विशेष स्किम, विविध योजांची माहिती देणाऱ्या बातम्यांना प्रसिद्धी दिली जाईल.
आजच संपर्क करा
९५९५०४७६७६, ९५०३६३८६८६

# महिला सक्षमीकरणासाठी 'उमेद' च्या माध्यमातून कृतिशील प्रयत्न-प्रधान सचिव एकनाथ डवले

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातील (उमेद) स्वयंसहाय्यता गटाच्या महिलांच्या कृषी व बिगर कृषी उत्पादनांना शाश्वत बाजारपेठ मिळवून देण्यासाठी शासन प्रयत्न करत आहे. 'उमेद'च्या महिलांचा उत्पादित माल मोठ्या कंपन्या आणि खरेदीदार यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी 'बायर – सेलर मीट' हा नाविन्यपूर्ण कार्यक्रम मैलाचा दगड ठरणार असल्याचे प्रतिपादन ग्राम विकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी केले.

देशभरातील प्रमुख ४१ साखळी व्यवसाय कंपन्यांच्या प्रतिनिधींसह राज्यभरातून स्वयंसहाय्यता गटाच्या आणि शेतकरी महिला उत्पादक कंपनीच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीमध्ये २८ करार या कार्यक्रमात करण्यात आले. नवी मुंबई येथे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांनी बेसिक्सच्या सहाय्याने राज्यस्तरीय 'बायर – सेलर मीट' चे आयोजन केले होते. कार्यक्रमासाठी उमेद अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी रुचेश जयवंशी, मुख्य परिचालन अधिकारी परमेश्वर राऊत, अवर सचिव धनवंत माळी, उपसंचालक शीतल कदम उपस्थित होते.

प्रधान सचिव श्री. डवले म्हणाले की, ग्रामविकास विभाग 'उमेद' अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वायत्त होण्यासाठी विविध प्रकारे मदत करत आहे. महिलांची उत्पादने दर्जेदार आहेत, गुणवत्तापूर्ण आहेत. आता त्यांना शाश्वत बाजारपेठ मिळवून देणे आवश्यक आहे. साखळी व्यावसायिक आणि मोठमोठ्या कंपन्यांनी पुढे येऊन या महिलांना सक्षम बनण्यासाठी हातभार लावावा. अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. जयवंशी यांनी 'उमेद'च्या उत्पादक महिलांना सातत्याने विक्रीसाठी वेगवेगळे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

त्याचबरोबर खरेदीदार कंपन्यांना उत्तम प्रतीचा आणि शुद्धता असलेला शेतमाल आणि इतर उत्पादने उपलब्ध करून देण्यासाठी समन्वय ठेवण्यासाठी यंत्रणेला जिल्हा आणि राज्यस्तरावरून कार्यरत करण्यात आलेले असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यभरातील ३४ जिल्ह्यातून 'उमेद' अंतर्गत कार्य करत असलेल्या महिलांच्या प्रतिनिधी उत्पादन किंवा शेतमालाच्या नमुन्यांसह उपस्थित होत्या. त्यात सोयाबीन, मिरची, हळद, तूर, हरभरा, मका, बाजरी, नाचणी, ज्वारी यासारखे दर्जेदार धान्य आणि कडधान्य तसेच मसाले, गूळ, मध, फळे, वनौषधी, तेलबिया इत्यादी उत्पादने नमुना स्वरुपात उपलब्ध करून देण्यात आले होते. खरेदीदार म्हणून ३० पेक्षा जास्त संस्था आणि कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सेंद्रिय आणि शुद्धता असलेले उत्पादने महिलांनी उपलब्ध करून दिल्यामुळे खरेदीदार संस्था आणि कंपन्यांच्या प्रतिनिधी यांनी करार करण्यासाठी उत्साह दाखवला. या कार्यक्रमात खरेदीदार यांनी दाखविलेल्या रुचीमुळे भविष्यात महिलांना शाश्वत बाजारपेठ मिळण्यास मदत होणार आहे.

# बांधकाम कामगारांना सुरक्षा व अत्यावशक संचाचे वितरण

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुंबई अंतर्गत मंडळाचे नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांसाठी सुरक्षा संच व अत्यावशक संचाचे वाटप गुरूवार, ५ ऑक्टोबर २०२३ रोजी कामगार मंत्री तथा पालकमंत्री डॉ.सुरेश खाडे व आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. हा कार्यक्रम बालगंधर्व नाट्यगृह मिरज येथे सायंकाळी ५ वाजता होणार असल्याचे सहाय्यक कामगार आयुक्त मु.अ.मुजावर यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.या कार्यक्रमात पात्र नोंदित लाभार्थी बांधकाम कामगारांना धनादेश वितरीत करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कामगार विभागामार्फत करण्यात आले आहे.

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन– ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक माणदेशी बुलंद आवाज...

# माणदेश एक्सप्रेस






## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना संवेदनशीलपणे मदत करावी विमा कंपन्यांना निर्देश–मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई :** राज्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विमा योजनेतून नुकसान भरपाई देताना कंपन्यांनी संवेदनशीलपणे आणि सकारात्मक भावनेने मदत करावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विमा कंपन्यांना दिले. वर्षा निवासस्थानी प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या खरीप हंगाम अंमलबजावणीबाबत आढावा बैठक मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झाली. कृषिमंत्री धनंजय मुंडे, सार्वजनिक बांधकाममंत्री (सार्वजनिक उपक्रम) दादाजी भुसे, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, मुख्य सचिव मनोज सौनिक, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव अनुपकुमार, कृषी आयुक्त सुनिल चव्हाण यांच्यासह विमा कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



मुख्यमंत्री श्री. शिंदे यावेळी म्हणाले, ऑगस्टमध्ये पावसाने ओढ दिल्याने राज्यातील शेतकरी बांधव त्रस्त आहे. त्याला दिलासा देण्यासाठी राज्य शासन खंबीरपणे पाठीशी उभे आहे. विमा कंपन्यांनीदेखील या काळात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे. त्यामुळे शेतकरी संकटात असताना त्याला मदत करण्याची भूमिका संवेदनशीलपणे आणि सकारात्मक भावनेने घ्यावी, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. बळीराजाला दिलासा म्हणून राज्य शासनाने एक रुपयामध्ये पीक विमा योजना सुरू केली आहे. अशी विमा योजना सुरू करणारे महाराष्ट्र पहिले राज्य असल्याचे सांगत विम्यापोटी शेतकऱ्यांनी भरायचा हिस्सा राज्य शासन अदा करत आहे. यामागची शासनाची भूमिका विमा कंपन्यांनी समजून घेतली पाहिजे. विमा कंपन्यांनी प्रस्तावांवर जे आक्षेप घेतले आहेत. ते जिल्हाधिकाऱ्यांनी वस्तुनिष्ठ पद्धतीने तपासून घ्यावेत, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांना वेळेवर मदत करावी, असे मंत्री श्री. मुंडे, श्री. भुसे यांनी यावेळी सांगितले. खरीप २०२३ मध्ये प्रधानमंत्री पिकविमा योजनेसाठी १ कोटी ७० लाख अर्ज प्राप्त झाले आहेत. ११३ लाख हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित आहे. ओरिएन्टल इन्शुरन्स, आयसीआयसीआय लोम्बार्ड, युनिव्हर्सल सोम्पो, युनायटेड इंडिया, चोलामंडलम एम एस., भारतीय कृषी विमा कंपनी, एचडीएफसी अर्गो, रिलायन्स जनरल या विमा कंपन्या राज्यात कार्यरत आहेत.

## धनगर समाजाचे प्रश्न प्राधान्याने सोडविणार–मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

**मुंबई :** धनगर समाजाचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. त्यांच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक असल्याची माहिती, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.



वांद्रे येथील मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयात धनगर समाज संघर्ष समिती आणि मेंढपाळ विकास मंचच्या शिष्टमंडळाने मंत्री श्री. विखे पाटील यांची भेट घेतली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी त्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन मंत्री श्री. विखे पाटील यांना दिले. दरम्यान, शिष्टमंडळाशी सविस्तर प्राथमिक चर्चा करून मंत्री श्री. विखे पाटील यांनी विषय समजून घेतले. तसेच लवकरच याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमवेत बैठक घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी खासदार डॉ. विकास महात्मे, माजी आमदार रामराव वडकुते, मेंढपाळ विकास मंचचे प्रदेश अध्यक्ष संतोष महात्मे, मेंढपाळ फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या संचालक पल्लवी लांडे, संचालक प्रवीण भुजाडे यांच्यासह पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास विभागाचे सचिव तुकाराम मुंडे, पशुसंवर्धन आयुक्त डॉ. हेमंत वसेकर आणि मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी राजेंद्र भोसले यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांनी घेतली राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट

**नवी दिल्ली :** राज्यातील आदिवासी समाजाच्या प्रश्नांबाबत विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांच्या नेतृत्वाखाली अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम व आठ आमदारांच्या शिष्टमंडळाने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची राष्ट्रपती भवन येथे भेट घेतली.



या शिष्टमंडळामध्ये विधानसभा उपाध्यक्ष श्री. झिरवाळ, मंत्री श्री. आत्राम यांच्यासह सर्वश्री सुनील भुसारा, दौलत दरोडा, हिरामण खोसकर, शांताराम मोरे, शिरीषकुमार नाईक, काशिराम पावरा, डॉ.देवराम होळी, राजेश पाडवी व आमश्या पाडवी यांनी राष्ट्रपती श्रीमती मुर्मू यांना राज्यातील आदिवासी समाजाच्या प्रश्नांबाबत निवेदन सादर केले.

या बैठकीनंतर, श्री. झिरवाळ यांनी माध्यम प्रतिनिधींसमवेत संवाद साधला. आदिवासी समाजातील समस्या मांडाव्यात यासाठी दिल्लीत शिष्टमंडळासह दाखल झाल्याचे सांगितले व राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांच्या समस्या सोडविण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे श्री. झिरवाळ यांनी यावेळी सांगितले.

## अभय वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना दिले फिटनेसचे धडे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/प्रतिनिधी :** देशाची भावी युवा पिढी सामाजिक, शारीरिक दृष्ट्या सुदृढ करायची असेल तर व्यायाम हा प्राथमिक आणि मुलभूत आहे. शारिरीक तंदुरुस्ती निर्माण झाल्याने आपली सामाजिक.मानसिक शरीरयष्टी दणकट होण्यास मदत होते. आपला सर्वांगीण विकास होतो, यासाठी लहानपणापासून मुलांना व्यायामाचे धडे देण्याची गरज आहे असे प्रतिपादन, माजी आमदार स्वर्गीय धोंडीराम वाघमारे प्रतिष्ठान व फ्युचर फर्स्ट फाऊंडेशन नवी मुंबई चे अभय वाघमारे यांनी केले.

गोखळी ता.फलटण येथे प्रतिष्ठान विद्यमाने सामाजिक बांधिलकी जोपासून मोफत आरोग्य जनजागृती शिबीराचे आयोजन करण्यात आले यावेळी वाघमारे बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीराम बझारचे संचालक मारुतराव गावडे होते.

पुढे बोलताना वाघमारे म्हणाले, लहानपणापासून मुलांना व्यायामाचे धडे दिल्यावर व्यायामामुळे आपल्या शरीरात यडोफीन नावाचा हार्मोन्स तयार होतो तो आपणांस मानसिक दृष्ट्या कणखर आनंदी बनवतो. अभ्यासामध्ये आत्मविश्वास निर्माण करतो असे सांगून ते पुढे म्हणाले, माझे वडील माजी



**गोखळी : येथे माजी आमदार स्वर्गीय धोंडीराम वाघमारे प्रतिष्ठान व फ्युचर फर्स्ट फाऊंडेशन नवी मुंबई चे अभय वाघमारे यांचा सत्कार करताना उपस्थित मान्यवर**

आमदार स्वर्गीय धोंडीराम वाघमारे यांनी आपल्या आमदारकीच्या दहा वर्षांच्या कालावधीत राजकीय सामाजिक काम करत असताना आपल्या कार्यकर्तृत्वाचा उठवला. फलटण पूर्व भागातील जनतेशी जिव्हाळ्याचे ऋणानुबंध जोपासले. या भागातील जनतेने माझ्या वडिलांवर जिवापाड प्रेम केले होते. त्याच्या पश्चात आपणही या भागातील लोकांसाठी काहीतरी करायचे या उद्दात उद्देशाने आमदार स्वर्गीय धोंडीराम वाघमारे प्रतिष्ठान व फ्युचर फर्स्ट फाऊंडेशन नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने लोकांना त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी आरोग्य व स्वास्थ्य चांगले रहावे यासाठी निरोगी आयुष्य जगण्यासाठी गोखळी ता. फलटण येथील जिल्हा परिषद शाळा व हनुमान विद्यालयातील विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना फ्युचर फर्स्ट कन्सल्टंट संस्थापक अभय धोंडीराम वाघमारे यांनी स्वतः फिटनेसचे धडे दिले.रोजच्या जीवनात करायचे सांधे सोपे व्यायामाचे प्रकार प्रात्यक्षिकासह करून दाखवले.

या कार्यक्रमास सरपंच सुमनताई गावडे, भाजपचे तालुकाध्यक्ष बजरंग गावडे, श्रीराम पतसंस्थेचे चेअरमन डॉ. शिवाजीराव गावडे, बाजार समितीचे संचालक ज्ञानदेव गावडे, श्रीराम सहकारी साखर कारखान्याचे संचालक संतोष खटके, गोखळी सोसायटीचे माजी चेअरमन तानाजी बापू गावडे, दादासाहेब खटके ,हनुमान माध्यमिक विद्यालययाचे प्राचार्य हरीभाऊ अभंग, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक बाळासाहेब भोसले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.








## राज्यपालांच्या हस्ते मुंबईत जागतिक व्यापार प्रदर्शनाचे उद्‌घाटन

**मुंबई :** भारताच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जी – २० शिखर परिषदेच्या यशानंतर भारताचे जागतिक पटलावर महत्त्व अधोरेखित झाले आहे. विविध देश आज व्यापार विस्तारासाठी चीनला समर्थ पर्याय म्हणून भारताकडे पाहत आहेत. युवा लोकसंख्येच्या रुपाने भारताला आणखी एक लाभांश मिळाला आहे. या महत्त्वाच्या वेळी आयोजित करण्यात आलेले जागतिक व्यापार प्रदर्शन विविध देशांमध्ये व्यापार सहकार्य व विकास वाढविण्याच्या दृष्टीने मैत्रीपूर्ण पुलाचे कार्य करेल, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केले.

राज्यपाल श्री. बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथील जागतिक व्यापार केंद्र येथे मंगळवारी (दि. ३) दोन दिवसांच्या चौथ्या जागतिक व्यापार प्रदर्शनाचे उद्घाटन झाले, त्यावेळी ते बोलत होते. वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबई व ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीजतर्फे जागतिक व्यापार प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.



'व्यापार, तंत्रज्ञान व पर्यटन' या विषयावर या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. आज पर्यटन हा जागतिक अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक झाला आहे. गेल्या वर्षी एकट्या भारतातून १.८० कोटी पर्यटक विविध देशांत गेले व ६१ लाख विदेशी पर्यटक भारतात आले. देशांतर्गत १७.३१ कोटी पर्यटकांनीदेखील पर्यटनाला चालना दिली.

महाराष्ट्र उद्योग व गुंतवणुकीच्या दृष्टीने सर्वांत आकर्षक राज्य असून राज्यात पर्यटन विकासाच्या अनेक संधी आहेत. वर्ल्ड ट्रेड एक्स्पोच्या माध्यमातून विविध देशांना आपल्या देशातील व्यापार, गुंतवणूक व पर्यटनाच्या संधी दाखविण्याची तसेच राज्यातील व्यापाराच्या शक्यता जाणून घेण्याची संधी मिळेल, असे राज्यपालांनी सांगितले.

व्यापार प्रदर्शनात सहभागी सर्व देशांनी महाराष्ट्राशी सहकार्य वाढवावे व इतर क्षेत्रांमध्ये सहकार्याची नवनवी क्षितिजे शोधावीत अशी सूचना राज्यपालांनी यावेळी केली.



# जेसीबीच्या सहाय्याने तलाठी कार्यालय भिंत पाडली

**खेराड वांगीतील नागरीकांचे आमरण उपोषण सुरूच : संग्रामसिंह देशमुख यांची आंदोलन स्थळी भेट**

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कडेगांव :** खेराडे वांगी येथे अज्ञात लोकांनी तलाठी कार्यालयाची भिंत जेसीबीच्या सहाय्याने पाडून शासकीय मालमत्तेचे नुकसान केले. या संदर्भात दोषींवर कारवाई करण्यासाठी खेराडे वांगी गावातील नागरिकांनी व विकास दत्तात्रय सुर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली काल पासून तहसिलदार कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले असून जन आंदोलन करून आमरण उपोषण सुरूच ठेवले आहे.



**खेराडे वांगी : गावातील तलाठी कार्यालयाची भिंत अज्ञाताने पाडल्याने तहसिलदार कार्यालयासमोर नागरीकांचे सुरु असलेले आमरण उपोषण**

सांगली जिल्हा षरीषदेचे माजी अध्यक्ष व जिल्हा बँक संचालक संग्रामसिंह देशमुख, कडेगांव नगराध्यक्ष धनंजय देशमुख, प्रकाश गढळे, चंद्रकांत पाटील, विकास सुर्यवंशी, आबासाहेब करांडे, संभाजी जाधव,आंदोलन स्थळी भेट देऊन लोकांच्या समस्या जाणून घेवून भिंत पाडणाऱ्या लोकांना चौकशी होवून कारवाई करावी अशी मागणी तहसिलदार यांचेकडे केली आहे. उपोषणास सागर तानाजी हजारे, दत्तात्रय नानासो सूर्यवंशी, संदीप रामचंद्र सूर्यवंशी, सुनील दत्तात्रेय सूर्यवंशी हे बेमुदत उपोषणास बसले आहेत.

# महात्मा गांधी विद्यालय व जुनिअर कॉलेज दहिवडीचे तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत यश

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/प्रतिनिधी :** महात्मा गांधी विद्यालय व जुनिअर कॉलेज दहिवडीने शैक्षणिक गुणवत्तेबरोबर क्रीडा क्षेत्रातील अग्रेसर राहण्याचा मान मिळवला आहे. नुकत्याच शंभू महादेव विद्यालय वरकुटे-म्हसवड येथे झालेल्या तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत महात्मा गांधी विद्यालय व ज्युनिअर कॉलेज दहिवडी मधील मुलांच्या सतरा वर्षे वयोगटाखालील कबड्डी स्पर्धेत पारंपारिक प्रतिस्पर्धी गणेश विद्यालय नरवणे या संघावर दणदणीत विजय मिळवला.

त्याचबरोबर १९ वर्षे वयोगटातील मुलींचा संघ उपविजेता ठरला. तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये महात्मा गांधी व ज्युनिअर कॉलेज दहिवडीच्या कबड्डीपटूंनी पुन्हा एकदा वर्चस्व प्रस्थापित केले.



**दहिवडी : तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत यश मिळविलेल्या महात्मा गांधी विद्यालय व जुनिअर कॉलेजचे यशस्वी विद्यार्थ्या समवेत शिक्षक वृंद**

याचबरोबर मैदानी स्पर्धेत ही महात्मा गांधी विद्यालय व ज्युनिअर कॉलेजने आपला ठसा कायम राखला. १९ वर्षाखालील मुले ३००० मीटर धावणे स्पर्धेत प्रथम क्रमांक तसेच १९ वर्षाखालील मुली रिले स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. त्याचबरोबर शंभर मीटर धावणे १९ वर्षाखालील मुली द्वितीय क्रमांक, गोळा फेक द्वितीय क्रमांक पटकावला.

या यशस्वी खेळाडूंना क्रीडा शिक्षक ज्ञानेश काळे, धर्मराज पवार, बाबा चौधरी आणि मीना पाटील यांनी मार्गदर्शन केले. खेळाडूंनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विद्यालयाचे प्राचार्य बी.एस. खाडे, पर्यवेक्षक ए.बी.शेख तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# समाजाप्रती संवेदना बाळगून सामान्यांच्या जीवनात आनंद निर्माण करा

## ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन : स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांच्या गौरव प्रसंगी सल्ला

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** स्पर्धा परीक्षेत यश मिळवून शासकीय सेवेत दाखल होत असलेल्या उमेदवारांनी समाजाप्रती संवेदना बाळगून आपल्या कर्तव्यातून सामान्य माणसाच्या जीवनात आनंद निर्माण करण्यासाठी सचोटीने काम करावे, असा मोलाचा सल्ला ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन यांनी स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांना सल्ला दिला.

राजर्षी शाहू स्पर्धा परीक्षा प्रबोधिनी व अभ्यासिका यांच्यावतीने आयोजित स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव प्रसंगी ते बोलत होते.

इस्लामपूर येथील राजारामबापू पाटील नाट्यगृहात झालेल्या या कार्यक्रमास आमदार गोपीचंद पडळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, पोलीस उप अधीक्षक प्रणिल गिल्डा, माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत,



**इस्लामपूर : स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करताना मंत्री गिरीश महाजन, आम. गोपीचंद पडळकर व मंचावर उपस्थित मान्यवर**

तहसीलदार राकेश गीते, प्रदीप उबाळे, जिल्हा बँकेचे संचालक सत्यजित देशमुख यांच्यासह मान्यवर, स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी व त्यांचे पालक उपस्थित होते.

यशस्वी विद्यार्थ्यांच्या यशामागे त्यांच्या आई-वडिलांचा, पालकांचा मोठा वाटा आहे. त्यांच्या प्रती नेहमीच कृतज्ञता ठेवावी, असे सांगून ग्रामविकास मंत्री श्री. महाजन म्हणाले, आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवावी. शासन सेवा मिळाल्याने सामान्य माणसाला शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आग्रही रहावे. चांगल्या कामातून वेगळी ओळख निर्माण होत असते. यासाठी आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीशी आपुलकीने वागून त्यांचा आधार बना, असा सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

श्री. महाजन म्हणाले, यापुढे विद्यार्थ्यांनी कौशल्यावर आधारीत शिक्षण, प्रशिक्षण घेवून स्वत:चा व्यवसाय उद्योग सुरू करण्यासाठी पुढे येणे गरजेचे आहे. शासन उद्योग व्यवसायाला आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देत असून याचा लाभ घेवून यशस्वी उद्योजक बनावे. याबरोबरच तरूणांनी स्वत:ला व्यसनापासून दूर ठेवावे, असे आवाहनही त्यांनी केले.

आमदार गोपीचंद पडळकर यांनी स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून शासन सेवेत आलेल्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या योजना तळागाळापर्यंत पोहचवून सामान्य माणसाचे जीवन सुखकर करावे, असे आवाहन केले.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे म्हणाल्या, प्रशासनात काम करताना आव्हाने पेलावी लागतात. यासाठी मानसिक स्थितीबरोबरच संयम बाळगणे तितकेच महत्वाचे आहे. प्रत्येकाने मिळालेल्या संधीचे सोने करून समाजाप्रती आपली संवेदना जपावी, असेही त्या म्हणाल्या.

पोलीस उप अधीक्षक प्रणिल गिल्डा यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून तरूणांनी कारणांच्या मागे न लागता कष्टाची तयारी ठेवावी, असा सल्ला दिला. यावेळी माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत, सत्यजित देशमुख यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात १२५ हून अधिक स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा गौरव मंत्री महाजन व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

# मुख्याधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करा : राजकुमार हिवळकर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**



**राजकुमार हिवळकर**

**नातेपुते/वार्ताहर :** नातेपुते नगरपंचायतीला मी मागणी केल्याप्रमाणे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २ कोटी ९० लाख रुपयांचा निधी स्ट्रीट लाईटसाठी मंजूर केलेला आहे. परंतु नगरपंचायतीचे मुख्याधिकारी व पदाधिकारी यांनी प्रोटोकॉल प्रमाणे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री दुसरे उपमुख्यमंत्री यांचा फोटो न लावता मुख्यमंत्री उपमुख्यमंत्र्यांचा अवमान केलेला आहे.ही वृत्ती अतिशय खेदजनक असून यामुळे नातेपुते नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी अशी मागणी शिवसेना तालुकाप्रमुख राजकुमार हिवळकर यांनी केली आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले, जर अशी वृत्ती वेळीच न ठेचल्यास भविष्यात राज्यात असाच पायंडा पडेल. त्यामुळे शिस्तबंगाची कारवाई म्हणून नातेपुते नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांची बदली करावी अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे करणार असल्याचे राजकुमार हिवळकर म्हणाले.

# औषध दुकानांमध्ये १० ऑक्टोबरपर्यंत सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** Schedule H, HI व X औषधाची विक्री करणाऱ्या सांगली जिल्ह्यातील सर्व औषध विक्री दुकानांमध्ये १० ऑक्टोबर २०२३ पर्यंत सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १३३ अन्वये प्राप्त अधिकारानुसार निर्गमित केले आहेत.

आदेशात म्हटले आहे, लहान मुलांना डलहशर्वीश्रश क, कख व द औषधे डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय सहज मिळतात त्यामुळे त्यांचे सेवन केल्याने ही मुले औषधांवर अवलंबून राहतात. सध्या त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यामध्ये तरतुदी आहेत. तथापी त्यावर मजबूत देखरेख यंत्रणा व अहवाल प्रणाली विकसीत करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी डलहशर्वीश्रश क, कख व द औषधाची विक्री करणाऱ्या सांगली जिल्ह्यातील सर्व औषध विक्री दुकानावर लक्ष ठेवण्यासाठी कॅमेरे लावणे अनिवार्य आहे.

या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस प्रशासन, अन्न व औषध प्रशासन, बाल कल्याण पोलीस अधिकारी हे सक्षम प्राधिकारी असतील. नियमावलीप्रमाणे तपासणीचे अधिकार पोलीस उपनिरीक्षक व त्यापेक्षा वरिष्ठ दर्जाचे अधिकारी, औषध निरीक्षक व बाल कल्याण पोलीस अधिकारी यांना असतील. औषध आस्थापनांनी आवश्यकतेप्रमाणे सीसीटीव्ही फुटेज संबंधित सक्षम प्राधिकारी यांना उपलब्ध करून देणे बंधनकारक असेल, असे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी जारी केले आहेत.

# आप खासदार संजय सिंह यांना ईडीकडून अटक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**



**खास. संजय सिंह**

**नवी दिल्ली :** आम आदमी पक्षाचे राज्यसभा खासदार संजय सिंह यांना ईडीने अटक केली आहे. बुधवारी सकाळी ७ वाजता ईडीचे पथक त्यांच्या दिल्लीतील घरी पोहोचले. १० तास चाललेल्या छाप्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. दिल्लीतील मद्य धोरण घोटाळ्यासह मनी लॉंड्रिंग प्रकरणाचीही ईडीकडून चौकशी सुरू आहे. याप्रकरणी नुकत्याच दाखल करण्यात आलेल्या ईडीच्या आरोपपत्रात आप नेते संजय सिंह यांच्या नावाचाही उल्लेख आहे.

संजय सिंह यांच्या अटकेची माहिती मिळताच आम आदमी पक्षाचे कार्यकर्ते त्यांच्या निवासस्थानाबाहेर जमले आहेत. कामगार एजन्सी आणि मोदी सरकारच्या विरोधात घोषणा देत आहेत. संजय सिंह यांच्यावरील या कारवाईवरून विरोधी पक्षांनीही मोदी सरकारवर निशाणा साधला आहे.

संजय सिंह यांच्या अटकेवर आप खासदार राघव चड्ढा म्हणाले की, गेल्या पंधरा महिन्यांपासून भाजप आप कार्यकर्त्यांवर दारू घोटाळ्याचा आरोप करत आहे. मागील १५ महिन्यांत ईडी आणि सीबीआयने १००० ठिकाणी छापे टाकले आहेत. काही लोकांना अटक, तपास छापे टाकल्यानंतर एकाही एजन्सीला एक पैसाही सापडलेला नाही. आगामी निवडणुकांमध्ये पराभव पत्करावा लागणार असल्याने भाजप घाबरून हे करत आहेत. त्यामुळे संजय सिंह यांच्या घरावर छापा टाकून त्यांना अटक केली आहे.






# राष्ट्रीय रोप स्किपिंग स्पर्धेत क्रांतिवीर संकुलाचा डंका

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/प्रतिनिधी :** नाशिक येथे संपन्न झालेल्या ११ वर्ष वयोगटातील राष्ट्रीय रोप स्किपिंग स्पर्धेत क्रांतिवीर शैक्षणिक संकुल म्हसवड च्या खेळाडूंना सात ब्रांन्झ पदक मिळाले असून या निमित्ताने माण तालुक्याचा डंका राष्ट्रीय स्तरावर पोहोचविला आहे.



**म्हसवड : राष्ट्रीय रोप स्किपिंग स्पर्धेतील क्रांतिवीर संकुलातील यशस्वी विद्यार्थी**

महाराष्ट्र राज्य हौशी रोप स्किपिंग असोसिएशन यांच्या वतीने नाशिकच्या मिनाताई ठाकरे विभागीय क्रीडा संकुलात २९ सप्टेंबर ते २ऑक्टोबर दरम्यान २४ व्या राष्ट्रीय रोप स्किपिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये देशातील २० राज्यातील ८०० खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत महाराष्ट्र संघातून खेळताना क्रांतिवीर शैक्षणिक संकुलातील विविध गटात २० खेळाडूंनी सहभाग नोंदवून उज्ज्वल यश संपादन केले.

क्रांतिवीर संकुल म्हसवडचे खेळाडू प्रतिक खाडे याने स्पीड जॉगर व डबल डच सिंगल फ्री स्टाईल मध्ये तृतीय क्रमांक, शौर्य कलढोणे, ईश्वरी त्रिगुणे, शिवश्री शेटे डबल डच सिंगल फ्री स्टाईल मध्ये तृतीय क्रमांक तसेच संस्कृती ढाले, प्रकाश पुकळे यांनी टीम डेमो या क्रीडा प्रकारात तृतीय क्रमांक मिळवला यशस्वी खेळाडूंना क्रीडा शिक्षक तुकाराम घाडगे व चंद्रकांत तोरणे यांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी खेळाडूंच्या यशाबद्धल रोप स्किपिंग असोसिएशन सातारा जिल्हाध्यक्ष विश्वंभर बाबर, संस्था सचिव सुलोचना बाबर, क्रीडा मार्गदर्शक ज्ञानेश काळे, पुरुषोत्तम जगताप, राज्य सचिव संजय पाटील, तांत्रिक समिती प्रमुख गिरीश टोकसे, पवन खोडे,रोप स्किपिंग जिल्हा सचिव चंद्रकांत तोरणे, क्रांतिवीर इंग्लिश मेडीयम स्कूल म्हसवड चे प्राचार्य राहुल फुटाणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,पालक इत्यादींनी अभिनंदन केले.